ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नातील १५ टक्के
भाग मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करणे
बाबत

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जल संधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम २६०६/प्र.क्र.४२३३/पंरा ४(२२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर २००६**

**वाचा :-** शासन आदेश क्रमांक ग्रापप्र १०८९/प्र.क्र.१०५३/२१-अ दिनांक १८.११.१९८९

**शासन परिपत्रक -**

ग्रामपंचायतींनी त्यांच्य एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतिवर्षी मागासवर्गीयाच्या उन्नतीसाठी खर्च केली पाहिजे असे आदेश संदर्भाधीन दिनांक १८ नॉव्हेंबर १९८९ च्या परिपत्रकान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यांत आल्या आहेत. हा खर्च करीत असतांना कोणकोणत्या बाबी विचारात घेण्यांत याव्यात, व कोणकोणत्या बाबींवर खर्च करण्यांत येऊ नयेत यासंबंधीच्य सूचना उपरोक्त शासन आदेशान्वये सर्व जिल्हा परिषदांना देण्यंत आल्या आहेत.

२. सदर शासन आदेशान्वये ग्रामपंचयत कार्यक्षेत्रात राहणा-या मागासवर्गीय जाती व जमातीच्या कुटुंबाचे किंवा व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रुपये ६,४००/- पेक्षा अधिक आहे अशा व्यक्ती किंवा कुटुंबाना सदर योजनेपासून अपात्र ठरविण्यांत आले आहे. तथापि सदय:स्थितीत दारिद्रय रेषा ठरविण्यासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादेचा निकष वगळण्यांत आला आहे. त्याऐवजी राहणीमानानुसार १३ निकषाव्दारे मिळणा-या गुणांकाआधारे दारिद्रय रेषेखालील कुटुंबे ठरविण्यांत आली आहेत. त्यामुळे सदर आदेशात सदर बदल करणे आवश्यक आहे.

३. यास्तव सदर आदेशात या परिपत्रकान्वये सुधारणा करण्यांत येत असून त्यानुसार या योजनेसाठी पात्र लाभार्थी निवडण्याकरिता रुपये ६,४००/- ही वार्षिक उत्पन्न मर्यादा वगळण्यांत येऊन नवीन निकषाप्रमाणे पात्र दारिद्रय रेषेखालील सर्व मागासवर्गीय व्यक्ती किंवा कुटुंबे हे या योजनेसाठी लाभार्थी ठ.तील अशा सूचना देण्यांत येत आहेत. लाभार्थीचा प्राथम्यक्रम हा त्यांना BPL सर्वेक्षणामध्ये प्राप्त गुणांकानुसारच असावा. कमीत कमी गुण प्राप्त करणा-या कुटुंबाना प्राथम्याने लाभ देण्यांत यावा. तसेच लाभार्थींना लाभांची व्दिरुक्ती होणार नाही याचीही दक्षता घ्यावी. तसेच यापुढे यासदर्भात शासनाकडून दारिद्रय रेषेखालील कुटुबांसाठी वेळोवेळी ठरविण्यात येणारे निकष दिनांक १८ नोव्हेंबर १९८९ च्या शासन आदेशासाठी लागू राहील.

Scanned by CamScanner

४.वरील सूचना लक्षात घेऊन यापुढे ग्रामपचायतींनी त्यांच्या उत्पन्नातील १५ टक्के भाग मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करताना दारिद्रय रेषेखालील सर्व मागासवर्गीय जाती व जमाती यांना पात्र समजण्यांत यावे.

५.वरील सूचना सर्व ग्रामपंचायतीच्या तात्काळ निदर्शनास आणून या परिपत्रकाची अंमलबजावणी करुन घेण्यांत यावी, ही विनंती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/-
(सुनिल चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन

क्र.विशा/कार्या-३/ग्रा.पं./ कावि १३२२/ /२००६
विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, पहिला मजला,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक : २६ /१०/२००६.

प्रति
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.

२/- वरील शासन निर्णयाप्रमाणे आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यांत यावी.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग करिता

रत्नागिरी जिल्हा परिषद
१) दाखल तारीख 15 ... 2007
२) विभाग / शाखा
३) आवक क्रमांक ग्रापं
उप मु.का.अ./अति.मु.का.अ /मु.का.अ.

जिल्हा परिषद रत्नागिरी
ग्राम पंचायत विभाग
दाखल तारीख- 16 JAN 2007
विभाग क्रमांक
आवक क्रमांक- ११८६
...
सचिव/कक्ष अधि. उप मु.का.अ. (ग्रा.पं.)

प्रत...

क्र. रजिप/ग्रापं/ ...
जिल्हा परिषद, रत्नागिरी दि. ...

प्रति, गटविकास अधिकारी, पं.स. (सर्व)
... वरील शासन परिपत्रकातील सूचना आपले गटातील सर्व ग्राम